PAGE No.
DATE / /

## पुनरनिर्माण संबन्धी सभा - दि. 16-7-22.

विषय :- सल्लागारां सोबत चर्चा करून EOI डाकूमेंट्स फायनल करून पुढील वाटचाली ची Time frame ठरवणे.

संस्थे च्या पंच समिती सदस्या सोबत संस्थे च्या पुनर निर्माण प्रकल्पा चे सल्लागार श्री हर्षल कवडीकर आणि विधी सल्लागार श्रीमती काबरा यांची मीटिंग वरील विषया वर चर्चा करण्या साठी 16-7-22 ला सकाळी 11 वाजता संस्थे च्या मधुकर जोशी सभागृहात संपन्न झाली. श्री विजय सावंत अध्यक्ष स्थानी होते.

1. श्री कवडीकर यांनी EOI च्या मसुद्यात संस्थे तर्फे जे सुधार सांगण्यात आले होते त्यांचा विचार करून आवश्यक सुधार केल्या चे सांगितले.

2. त्यांनी असे ही सांगितले की जागेवर जाऊन फ्लॅट्स ची मोज माप त्यांनी केली त्यावरून त्यात, विशेष करून 545 आणि 665 sq. ft. साइज चे जे फ्लॅट्स, संस्थे च्या दाक्षिणे कडे 5 इमारतीतील, फ्लॅट्स चे मोज माप आणि कार्पोरेशन च्या ड्राइंग चे मोजमाप जुळत आहेत. बाकी इमारतीतील फ्लॅट्स मध्ये असे अंतर नाही.

ह्या वर सचिव श्री परवर्धन यांनी असे सुचवीले की ह्या पाच इमारतीतील फ्लॅट्स चे मोज माप परत एकदा घ्यावे व हा फरक का है ठरवावे.

3. श्रीमति काबरा यांनी प्रत्येक सभासदा कडून कागद पत्रां ची पुर्तता करणे का आवश्यक आहे ते सांगितले. फ्लॅट ताबा पत्र, लाइट बिल, कार्पोरेशन टॅक्स भरल्या ची पावती, तसेच आधार कार्ड आणि पॅन कार्ड ची प्रत सभासदा च्या फाइल मध्ये हवी. ज्या लोकांनी संस्थे मध्ये फ्लॅट संस्थे च्या मूल सभासदा कडून खरीद केले असेल तर त्या खरीद खता च्या Index-II ची प्रत लागेल.

त्यांनी हे पण सांगितले कि नॉमिनेशन - शेयर सर्टिफिकेट्स नावा वर होणे, किंवा खूब वर्षां पासून फ्लॅट मध्ये वास्तव्य

PAGE No.

DATE / /

असणे 'ओनरशिप' (मालकी हक्क) होत नाही. त्याकरिता जी काही प्रोसिजर आहे ती अवलंबून, कलेक्टर कडे आवश्यक फी भरूनच फ्लॅट ची मालकी हक्क प्रस्थापित होतो. जर मूळ मालकाने गिफ्ट डीड किंवा मृत्यु पत्र करून फ्लॅट कोणाला दिला असेल तर त्याचे ही कागद पत्रा मध्ये लागतील. ज्या सभासदां कडे हे पेपर्स नाहीयेत त्यांनी आत्ता पासूनच ह्याची पूर्तता करावी म्हणजे बिल्डर शी एग्रीमेंट करायची स्टेज आल्या नंतर ह्या कारणां मुळे प्रकल्प मागे पडायला नको.

4. ह्या आवश्यक कागद पत्रां संबन्धी तसेच पुढच्या प्रकल्पा च्या सूत्र चालवण्या साठी श्रीमती काबरा यांनी पहिले पंच समिती सदस्यां साठी आणी नंतर संस्थे च्या सर्व सभासदां साठी वर्कशॉप घेण्याची आवश्यकता विषद केली. ह्या प्रमाणे सल्लागारा च्या ऑफिस मध्ये दि. 23-7-22 रोजी सकाळी 10'30 ला, पंच समिती सदस्यां साठी वर्कशॉप घेण्याचे ठरविण्यात आले. ह्याच अनुषंगा ने श्रीमती काबरा यांनी त्यांच्या मते पंच समिती सदस्यां मध्ये एकवाक्यता नाही असे ही सांगितले.

5. श्री कवडीकरां नी सांगितले कि एकदा EOI चे परत मागितलेल्या सुधारांसह डाकुमेंट फायनल झाले कि त्यांनी पेपरस देण्या चे आणि त्याचे Administrative काम करण्या चे काम पंच समिती ने करायला हव. तसेच पुढल्या मीटिंग पर्यन्त (23-7-22) तारखां सकट पुरता प्रकल्प रोड मेप तैयार करण्या चा आणि पंच समिती समोर सादर करण्या चे त्यांनी सांगितले.

ह्या नंतर सर्वांना धन्यवाद देऊन अध्यक्षांनी मीटिंग संपल्या चे जाहिर केले.

मिनिट्स वाचून कनफर्म केले.

प्रदीप नेवाळकर

1. श्री विजय सावंत 27-7-22

DATE / /

| | | |
|---|---|---|
| 2. | डॉ विनायक पटवर्धन | |
| 3. | डॉ अनंत बेंदरकर | |
| 4. | डॉ विजय तोले | Vijay |
| 5. | डॉ अनंत शालीग्राम | |
| 6. | डॉ राजाराम जोशी | |
| 7. | डॉ सूर्यकांत ठाकोर | |
| 8. | श्रीमती अरुंधती भिडे | अरुंधती भिडे |
| 9. | श्रीमती ममता वावडेकर | मवावडेकर |